(सर्व कायदेशीर अथवा न्यायालयीन विवादासाठी या आदेशाचा इंग्रजी अनुवाद अधिग्राह्य धरण्यात येईल.)

वनजमीन-रायगड

भूमिगत वीज-तारा टाकण्यासाठी व वीज उपकेंद्राच्या बांधकामासाठी घारापूरी बेट (एलिफंटा लेणी), ता.उरण, जि.रायगड येथील ०.१७७२ हे. राखीव वनजमीन वन(संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत वळती करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन आदेश क्रमांकः एफएलडी-१३१७/प्र.क्र.४३८/फ-१०
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक: ३०.१२.२०१७

प्रस्तावना :

कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं.लि.,पनवेल यांनी वन विभागाकडे भूमिगत वीज-तारा टाकण्यासाठी व वीज उपकेंद्राच्या बांधकामासाठी घारापूरी बेट, ता.उरण, जि.रायगड येथील ०.१७७२ हे. राखीव वनक्षेत्र वळतेकरणाचा प्रस्ताव सादर केला आहे. सदर प्रस्तावाच्या सविस्तर छाननीअंती त्यास मंजूरी देण्याची बाब विचाराधीन होती.

शासन आदेश :

भारत सरकारच्या आदेश क्रमांक-F.No.११-९/९८/FC दि.१३.०२.२०१४ व दि.२१.०८.२०१४ अन्वये राज्यांना दिलेल्या अधिकाराचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी पत्र क्र. Desk-१७/NC/I/I.D-१२५४३/(६२)/ २२८२/ २०१७-१८, दि.२८.१२.२०१७ अन्वये घारापूरी बेट, ता. उरण, जि. रायगड येथे भूमिगत वीज-तारा टाकण्यासाठी व वीज उपकेंद्राच्या बांधकामासाठी ०.१७७२ हेक्टर राखीव वनक्षेत्राचे वन (संवर्धन) अधिनियम, १९८० च्या कलम-२ अंतर्गत वळतीकरण करण्यासाठी सादर केलेल्या प्रस्तावास **तत्वत:** मंजूरी देत आहे. सदर वनजमिनीचा तपशील खालीलप्रमाणे आहे :-

गाव	तालुका	जिल्हा	स. नं.	क्षेत्र (हे.)	वैधानिक दर्जा
घारापूरी	उरण	रायगड	३८/२	०.००६७	राखीव वन
			६६	०.०१४७	
			४०/१ (जुना ४०/ब)	०.०१२६	
			६४ (जुना ५५)	०.०४७३	
			५९/१ (जुना ५९/अ १)	०.०९५९	
			Total	०.१७७२	

२. सदर प्रस्तावास खालील अटींच्या अधीन राहून मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

i. वनक्षेत्राचा वैधानिक दर्जा बदलणार नाही.

ii. प्रकल्प यंत्रणेस वनविभागाने उपलब्ध करून दिलेल्या १.०० हे. अवनत वनक्षेत्रावर स्वखर्चाने पर्यायी वनीकरण करणे आवश्यक राहील.

iii. प्रकल्प यंत्रणेस वनविभागाने उपलब्ध करून दिलेल्या अवनत वनक्षेत्राच्या दुप्पट क्षेत्रासाठी विहित केलेली दंडनीय पर्यायी वनीकरणाची रक्कम अदा करणे आवश्यक राहील.

iv. प्रस्तावामध्ये ज्या प्रयोजनासाठी वनजमीन मागणी केलेली आहे त्याव्यतिरिक्त कोणत्याही प्रयोजनासाठी वनजमिनीचा वापर करता येणार नाही.

v. प्रकल्प यंत्रणेस ०.१७७२ हे. राखीव वनक्षेत्रासाठी नक्त वर्तमान मूल्याची रक्कम अदा करावी लागेल.

vi. केंद्र शासनाच्या नवीन मार्गदर्शक सूचनांनुसार / सुधारित दरानुसार नक्त वर्तमान मूल्याची रक्कम अदा करावी लागेल.

vii. प्रकल्पाचे काम करतेवेळी मजूर व इतर कर्मचारी यांचेकडून वनक्षेत्रातील वनस्पती व प्राणी यांना हानी पोहचणार याची जबाबदारी प्रकल्प यंत्रणेची राहील.

viii. प्रकल्पासाठी पर्यावरणविषयक मंजूरीची आवश्यकता असल्यास प्रकल्प यंत्रणा सदर मंजूरी प्राप्त करून घेईल.

ix. शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अटींचे पालन करणे प्रकल्प यंत्रणेस बंधनकारक असेल.

x. विविध अधिनियम व त्याअंतर्गत तयार केलेले नियम व मार्गदर्शक सूचनांचे पालन करणे आवश्यक राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१७१२३०१७०५१२१०१९ असा आहे. सदर निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Virendra R Tiwari

Digitally signed by Virendra R Tiwari
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a95e1a9759002ee190cd79464daaba7dc840ec375cd62a646a64986631086810, cn=Virendra R Tiwari
Date: 2017.12.30 17:12:49 +05'30'

(वीरेन्द्र तिवारी)
मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय)

प्रत:-

१. सचिव, पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली.
२. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (केंद्रीय), पश्चिम-मध्य क्षेत्र, पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार, नागपूर.
३. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
४. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
५. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, मुंबई / बेलापूर-नवी मुंबई.
६. जिल्हाधिकारी, रायगड.
७. मुख्य वनसंरक्षक (प्रा.),ठाणे.
८. उपवनसंरक्षक,अलिबाग.
९. कार्यकारी अभियंता, महावितरण कं. लि., पनवेल.
१०.निवडनस्ती (फ-१०).

Forest Land-Raigad.
Diversion of 0.1772 ha of Rreserved Forest land for Laying of Underground Electric Cable and Construction of Sub Station (Maintenance Room) at Gharapuri Island (Elephanta Caves), Tal-Uran, Dist-Raigad.

Government of Maharashtra
Revenue and Forest Department
Government Order No.: FLD-1317/CR-438/F-10
Mantralaya, Mumbai 400032
Date: 30.12.2017

Preamble :

Executive Engineer, Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd Panvel (U) Division, Panvel has submitted a proposal to the State Forest Department for diversion of 0.1772 ha. of Reserved Forest land for Laying of Underground Electric Cable and Construction of Sub Station (Maintenance Room) at Gharapuri Island (Elephanta Caves), Tal- Uran, Dist-Raigad. After careful consideration and scrutiny of the proposal, the Government is pleased to grant 'in-principle' approval as under-

Government Order :

In exercise of powers delegated to the State Government, vide Government of India's order no. F. No. 11-9/98/FC, dt.13.02.2014 and dtd.21.08.2014, Government of Maharashtra is pleased to grant **'in-principle'** approval to the diversion of forest land under section-2 of the Forest (Conservation) Act, 1980 for Laying of Underground Electric Cable and Construction of Sub Station (Maintenance Room) at Gharapuri Island (Elephanta Caves), Tal- Uran, Dist-Raigad, as per the proposal submitted by Additional Principal Chief Conservator of Forests & Nodal Officer, Maharashtra State, vide its letter no. Desk-17/NC/II/I.D-12543/(62)/2282/2017-18, dated 28.12.2017. The details are as given below:-

Village	Tah	Dist.	Survey No.	Area in ha.	Legal Status
Gharapuri	Uran	Raigad	38/2	0.0067	Reserved Forest
			66	0.0147	
			40/1 (Old 40/B)	0.0126	
			64 (Old 55)	0.0473	
			59/1 (Old 59/A1)	0.0959	
			Total	**0.1772**	

2. This approval is issued subject to the following conditions:-

i) The legal status of the land required will remain unchanged.

ii) Compensatory afforestation will be raised at the cost of the User Agency on 1.00 ha. degraded forest land made available by the Forest Department.

iii) The Project Authority will pay the cost of Penal Compensatory Afforestation on double degraded Forest land made available by the Forest Department.

iv) The forest land shall not be used for any purposes other than specified in the project.

v) The User Agency will defray the cost of Net Present Value of 0.1772 ha. of Forest land as per the latest guideline of Government of India.

vi) The User Agency will defray the additional / revised cost of Net Present Value of Forest land as per the latest Guideline of Government of India.

vii) It will be the responsibility of the User Agency to ensure that the labourers, staffs engaged in construction / Laying activity do not damage nearby forest flora and fauna.

viii) The User Agency will obtain Environment Clearance, if required.

ix) Any other conditions stipulated by Government time to time will be binding to User Agency.

x) Provisions of all Acts, Rules made there under and guidelines applicable to the project shall have to be strictly followed.

This Government Order is available at the website www.maharashtra.gov.in. with reference no.201712301705121019. This Order has been signed digitally.

By order and in the name of the Governor of Maharashtra.

Virendra R Tiwari

Digitally signed by Virendra R Tiwari
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a95e1a9759002ee190cd79464daaba7dc840ec375cd62a646a64986631086810, cn=Virendra R Tiwari
Date: 2017.12.30 17:13:04 +05'30'

(Virendra Tiwari)
Chief Conservator of Forests (Mantralaya)

Copy:-

1. Secretary, Ministry of Environment, Forests & Climate Change, Government of India, New Delhi.
2. Additional Principal Chief Conservator of Forests (Central), Ministry of Environment, Forests & Climate Change, Government of India, Regional Office, Western Central Zone, Nagpur
3. Principal Chief Conservator of Forests (Head of Forest Force), Maharashtra State, Nagpur.
4. Additional Principal Chief Conservator of Forests & Nodal Officer, Maharashtra State, Nagpur
5. Divisional Commissioner, Konkan Division, Mumbai / Belapur, Navi Mumbai.
6. Collector, Raigad.
7. Chief Conservator of Forests (T), Thane.
8. Deputy Conservator of Forests, Alibag.
9. Executive Engineer, Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd. Panvel (U) Division, Panvel.
10. Select File-F-10